Volume-7, 2021 ISSN 2394-6903

# RAINBOW

*Multidisciplinary Peer Reviewed Annual Journal*

Shri Nagpur Gujarati Mandal's

**V. M. VASANT COMMERCE, J. M. THAKAR ARTS & J. J. PATEL SCIENCE COLLEGE**

Wardhaman Nagar, Nagpur-8

| | | | |
|---|---|---|---|
| 14 | Function Of Indian Banks In Ushering Financial Inclusion Of Rural Sector | Dr. Pratap M. Chauhan | 111 |
| 15 | A study of Cashless India: The Digital India programme Government of India | Dr. Sudhir Godghate | 119 |
| 16 | Factors Influencing Performance of Corporate Bond Market– A Critical Review | Abhijeet Deshmukh<br>Dr. Malhar J. Kolhatkar | 122 |
| 17 | A Review On Modern Developments in Production and Operations Management | Mr. Shreekumar Nair<br>Dr. Aarti Kulkarni | 127 |
| 18 | Role of SIDBI in Promoting Woman Entrepreneurship in Small Scale Industries for developing SSI | Mr. Govindaraja A Bhatta<br>Dr. Milind A Barhate | 135 |
| 19 | CSR In FMCG Companies | Dr. N. S. Bagde | 143 |
| 20 | Renewable Energy | Dr. C. A. Dixit | 146 |
| 21 | E-Commerce Market In India | Dr. Anantkumar D. Gadre | 151 |
| 22 | Knowledge Management System | Dr. D. N. Padole | 155 |
| 23 | Business Process Outsourcing | Dr. Shrikant Pajankar | 158 |
| 24 | भारतीय अर्थव्यवस्था का विकास और पाँच ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था | डॉ. इफ्तेखार आर. हुसेन | 161 |


## Arts & Social Science


| | | | |
|---|---|---|---|
| 25 | Advancement of India's Economic and Defense Relations under 'Act East' Policy: An Overview | Dr. Charuta V. Joshi | 166 |
| 26 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर : सामाजिक परिवर्तनाच्या संघर्षात जाज्वल्य राष्ट्रभक्तीचे अधिष्ठान | डॉ. मुकुंदा मेश्राम | 172 |
| 27 | स्त्री सुधारक पंडिता रमाबाई | डॉ. कल्पना एम. सांगोडे | 181 |
| 28 | प्राचीन भारतीय विकसित समाज व्यवस्था | डॉ. प्रमोद सरदार | 186 |

 ISSN 2394-6903

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर : सामाजिक परिवर्तनाच्या संघर्षात जाज्वल्य राष्ट्रभक्तीचे अधिष्ठान

डॉ. मुकुंदा मेश्राम
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
श्रीमती राजकमल बाबूराव तिडके महाविद्यालय, मौदा.

प्रस्तावना

प्रत्येकाची राष्ट्रवती विवेकवत ज्ञानत्योत प्रज्वलित झाल्याशिवाय राष्ट्रसौष्ठवाच्या अडचणी दुर करता येणार नाही हे विद्यार्थदशेतच डॉ. बाबासाहेब आंबेडकररांच्या काळजात खोलवर कोरलेले दिसते. अमेरिकेहूण वडिलाच्या एका मित्रास लिहीलेल्या पत्रात ते म्हणतात आपल्या अस्पृश्य समाजातील प्रत्येक कार्यकर्त्यानि शिक्षणप्रसारासाठी झटले पाहीजे. भारतातील उपलब्ध अज्ञान, अंधश्रध्दा घालविण्यासाठी समग्र शैक्षणिक क्रांतीशिवाय तरणोपाय नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर १९१५ साली एम. ए. चे शिखण घेत होते. दरम्यान तत्कालीन बिन्नीचे भरतीय नेते सर फिरोजशाहा मेहता यांचा मृत्य झाला. त्यांच्या स्मृती चिरंतन राहाव्यात म्हणून मुंबई महानगर पालिकेसमोर त्यांचा पुतळा उभारावा अशा सुचना अनेकांनी केल्या तेव्हा त्यांनी मेहतांचे खरे स्मारक उभारायचे असेल तर एक भव्य ग्रंथालय उभारावे असे पत्राव्दारे सुचित केले. (थेसिस पी. एच. डी. परिचय ४८) संभ्रामक राजकारणाच्या गदारोळात संकुचित दृष्टिकोणातून पाहतांना त्यांना सकल राष्ट्रिय दृष्टिकोण सदोदीत दृष्टिआड राहिलेला आहे. खुद्दखुद त्यांनी ज्या समूहाचे नेतृत्व केले असा एकेरी शिक्का मारला जातो त्या दलित जातीतील लोकांनासुध्दा बाबासाहेबांचे वैचारीक अधिष्ठान केलेल नाही. सिडनेहम कॉलेजमध्ये प्राध्यापक असतांना त्यांनी क्रिकेटपटू बाळू बाबाजी पालवणकर व त्यांच्या भावाचा सत्कार समारंभ घडवुन आनला. मानपत्राचा मसुदा स्वत: तयार केला. त्यात 'ज्या भरतखंडाने आपल्या ....त्या भरतखंडाची लाज राखणारा वीर' हे शब्दांकन महत्वपूर्ण आहे. (किर. ४४)

भारतातील विकृत, विचित्र, विव्देशक जातीयतेमुळे अवघा भारत समाज सवर्ण व अवर्ण अशा व्दंव्दात गटांगळया खात आहे. हे त्यांच्या लक्षत आले नाही असे नाही. म्हणूनच त्यांनी २० जूलै १९२४ रोजी बहिष्कृत हितकारणी सभेची मुहूर्तमेढ रोवली तिचे अध्यक्ष सर चिमनलाल सेटलवाड होते. जे. पी. रुस्तमजी जिनवाला, जी. के. नरीमन, डॉ. वि. पा. चव्हाण, डॉ. र. पु. परांजपे, बा. गं. खेर हे उपाध्यक्ष होते (किर. ५७) सामाजिक चळवळीच्या प्रवर्तना प्रारंभापासुन खास भारत त्यांच्या हृदयात निरंतर स्पंदित घेतांना दिसतो. १९२७ मध्ये त्यांनी 'बहिष्कृत भारत' हे पाक्षिक सुरू केले नाव कीती मार्मिक आणि समर्पक। दोन शब्दात भारताचे वस्तूनिष्ठ प्रक्षेपण बहिष्कृत आहे पण भारत आहे. भारत आहे पण



Rajkamal Baburao Tidke Mahavidyalaya
SEAL

बहिष्कृत आहे. (किर. ८२) ते समग्र भारताच्या अविष्कृतीसाठी बहिष्कार भारताच्या न्याय हक्कांची ... सन्मानाची व संरक्षणाची कैफियत करत होते. यात गैर काय? सवर्णांनी अवर्णांवर जन्मदत ... उलथावण्यासाठी त्यांनी तहहयात संघर्ष केला. इतीपी सम्यक भारत समाज उभानी हा त्यांचा ... व्रतब्द हेतू होता. अजूनही वंशागत राजघरानांचा तोरा भयंकर आहे. लोकशाहीत राजेशाहीचा गा... करण्याचा सनसातनी हेतू चिंतनिय आहे. स्वातंत्र्यावेळी भारतात ५६३ राजवंश संस्थानिक होते. को... राजा बणविणार? त्यापैकी कोणत्या वंशाने अखिल भारत निर्मितीच्या ध्यास घेतला? वंशवाद व जा... एकाच दळभद्री औलाअीच्या सवती आहेत. हे समजून घेतले पाहीजे. सतात्मक राजकारनाच्या ग... बरेचदा स्वतंत्र भारताची राज्यव्यवस्था हंलकावे खाते इतीपी संकवधानाच्या कळेकोट बांधनिमूळे न... दळभद्र, फूटिर, कूटिल, कारस्थानांचा जेरबंद करता येते. स्वतंत्र भारताचे न्यायप्रवण राज्यशकट, सु... सुरळित मार्गाक्रम करत आहे. सारासार अभ्यास केल्यावर डॉ. बाबसाहेब आंबेडकर हेच भारता... संविधानाचे निर्माते होते हे स्पष्ट होते. संविधान लिहितांना त्यांच्यातिल राष्ट्रिय अभिधारणा ... ज्वाज्वल्य राष्ट्रभक्ती दैदिप्यमान होती. त्यामुहेच त्यांना मसुदा समितीचे निर्माते बनविण्यात ... महणूनच त्यांची राष्ट्रिय अभिव्याक्तीची अभिधारणा लक्षात घेतांना ती घडविणारी पाश्वभुमीदे... नीटपने दृष्टिपथात येणे आवश्यक आहे. या प्रमाणिक हेतूने सद्दु शोधनिबंध लिहिण्याचा प्रयत्न केल... आहे. वरिष्ठ जातीतील लोक हलाखिच्या स्थितीत आले महणमन आरक्षणाची मागणी करतात. तो त्या... संवैधानिक अधिकार आहे यात दूमत नाही. परंतू पुर्वापार हलाखित छडलेल्या, पिडलेल्या, नाडले... लोकांचया हलाखी कशी घालवायची याबाबत काहीच बोलत नाहीत. किंबहूणा शोषित, पिडित, द... जातीलील चार दोन विकसित प्रस्थ दाखवुन त्यांचा समात विकासाची आसमंजत भरारी मारत असल्या... भासवतात. असम्हाला आरक्षण देत नसाल तर त्यांचेहि आरक्षण बंद करा ......आम्ही संविधान बदल... टाकू'' अशी दंशोक्त भाषा बरि नाही. आईवडिल, आजी आजोबा, काका काकु, असे घरातील बहूत... सदस्य नोकरि असणारा मूलगा स्वतःच्या नोकरिसाठी एससी, एसटी, एनटी, एसबीसी, च्या आरक्ष... विरोधात मोर्चात सामील होतो. त्याला चिथावनी देणारी अन्यायग्रस्त अपेक्षित प्रताडितांना न्याय मी... नये असे मनसुबे ठेवता काय? असा प्रश्न पडतो. संविधान विरोध डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे अवमानना त्यातूनच उद्‌भवते दलितांच्या विकासाचा निधि अडेलटट्टू, बेजबाबदार कुत्सितवृतींच्या हरामखोरांनी दिलाच नाही दृ त्यांच्या विकास योजनांची सातत्याने मुस्कटदाबी करून फक्त दिखा... गवगवा केला जातो. यामूळे तळपातळीतील लोकांना मुख्य राष्ट्रिय प्रवाहात आणून कसे बलप्रवा... करावे? हा गिकटप्रश्न आहे. त्या दृष्टिने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची राष्ट्रभकती तपसातांना वेगळा विचार करणे अगत्याचे आहे.

**प्रवर्तनवादी जाणिवेचे सामाजिक राजकारणी:**

बर्ट्रांड रसेल या तत्वज्ञाने ष्जीम चतपदबपचंस व् विबपंस तमेजतपबजपवदष हा ग्रंथ लिहिला

 ISSN 2394-6903

त्यावर चिकीत्सा करतांना– ' समाजातील घटकांच्या एकमेकांतील योग्य अशा समजुतदारपणावरच अवलंबु आहे. असे विधान केले. समजूतदारपणाशिवाय कलह प्रतिबंधित करता येणार नाही. यावर त्यांचा कटाक्ष असला तरी शक्ती अर्थत उत्साह विधायक कार्य साधन्यासाठी लावला पाहीजे असेही तेथे ते आवर्जुन नमूद करतात. त्यांच्या मते 'एक जात म्हणजे एक एक मजला आहे'. एका मजल्यावर जाण्यास शिडि नाही. ज्या मजल्यात ज्यांनी जन्मावे, त्यांनी त्याच मजल्यात मरावे. आंतरजातीय विवाहास इच्छूकांचे ऑनर किलिंग मात्र जातीय अभिनीवेशाच्या अहंकारने होते. प्रत्येक उच्च जातीचा इसम त्याच्यापेक्षा खालच्या जातीतील लोकांचे उत्थान, सन्मान, संरक्षण कुत्सितपणे विचारात घेतो. अस्पृष्य जातीगटांच्या लोकांची आजतागायत कूचेष्ठा यथास्थित रामनाथ कोवींद राष्ट्रपती या पदावर विराजमान झाले. मात्र त्यांना पुरिच्या मंदिराच्या गाभऱ्यात जावुन दर्शन घेता येत नाही. कारण त्यांची कनिष्टतम जात आड येते. 'भारत स्वतंत्र होण्यानेच सर्व कार्यभाग साधेल, असे नाही. भारत हे असे राष्ट्र झालेपाहिजे की, ज्यात प्रत्येक नागरिकाला आर्थिक, धर्माक आणि राजकीय हक्क सारखे असुन व्यक्तीविकासाला प्रत्येक नागरिकाला वाव मीळेल. हा त्यांचा समताधिष्ठित न्यायप्रवण दृष्टिकोण बऱ्याच जनांना नीटपने कडलेला नाही. 'मछली अपने ताल मे–मगरमच्छ के जाल मे' असा मात्स्यन्याय समाजशिल मानवि संस्कृतीक समाजाला शोभनारा नाही. हे सांगण्याची गरज नाही. अस्पृश्यता निवरनाचे कार्य हे हिंदु महासभेचे आहे. त्याच्याशी राष्ट्रिय सभेचा काहीही संबंध नाही या कॉंग्रेसच्या निवाडयामूळे ते त्यावी युगाला तमोयुग म्हणतात. धर्माशी नीगडित असल्याने भारतातलेल जातीय तेढ भावनात्मक संघर्षामूळे अधिक क्लिष्ट बनते. वास्तवाचे भान न ठेवता स्वतःच्या परंपरागत प्रस्थापीत सोइ सुविधांसाठी इतरांना गूलामीत हलाहल करणे समूचित नाही. त्वरित तोडया बदलल्या पाहीजे. म्हणुन बाबसाहेब म्हणतात– 'गूलामाला त्याच्या गूलामाची जाणिव करून द्या म्हणजे तो आपोआप बंड करिल.' सार्वांनाच स्वातंत्राचा आस्वाद घेता यावा यासाठी सचेत केले पाहीजे. मूठभरांची मिरासदारी – बहूसंख्य अर्धपोटि जनां शिकारी होता कामा नये. निरंतर जातीवदाचे हलाहल अस्पृष्य लोकांमध्ये पुर्णतयः न्युनगंड बळावला होता. त्यांना तूम्ही या देशाचे रहिवासी आहात. तुम्हाला अन्नवस्त्र, आसरा इतर भारतीयांच्या बरोबरीने मिळणे हा तुमचा जन्मसिध्द हक्क आहे' असे ते निक्षुन सांगतात. उच्चवर्णीयांच्या छळवादि धोरणमूळे भारत राष्ट्रतर सोडा समाज संबोधण्याच्या सुध्दा पातळीचा नाही असे त्यांचे मत होते. गांधीजी १९३० साली मिठाच्या सत्याग्रह पुकारतात. बाबासाहेबांनी १९२७ साली महाळच्या चवदार तळ्यावर पाणी पिण्याच्या हक्कासाठी आंदोलन केले. तेव्हा आंदोलकांना गूराढोराप्रमाणे रक्तबंबाळ हाकइस्तोवर सिरंणकांनी मारहान मारहाण केली. त्यातील आठ गुंडांना पोलीसांनी पकडले. न्यायाधिशांनी पराकोटिचा पशवीपना दाखविणाऱ्यांना चार महीण्याची सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावली. न्यायालयातील मुख्याधिकारी स्पृष्य हींदू असते तर कदाचीत न्याय मीळाला नसता असा उसासा टाकतांना पेशव्याचे राज्य असते तर अशा सामाजिक बंडखोरोंना हत्तीच्या पायाखलीच देण्यात आले असते असे ते म्हणाले.

गळयात मळके आणि कंबरेलर झाडू बांधल्याशिवाय अस्पृश्यांना सस्त्याने फिरण्यास मज्जाव सावलीचा सुध्दा विंटाळ माणण्यात येई,' अशा समाजातील सर्वोच्च विद्याविभुषित बाबासाहेब १९३ - ३१ ब्रिटनमधिल गोलमेज परिषदेत सहभागी झाले. तेथे त्यांची ज्वाज्वल्य राष्ट्रभक्ती आणि भा स्वातंत्र्याविषयी सडेतोड भूमीका स्पष्ट झाली. असले सरकार काय कामाचे? असा ब्रिटिश ब्रिटिशराजा व पंतप्रधानाच्या समोर खडसावणारा ते दकमेव नेता आहेत. एरव्ही भारतात आं पुकारनारे दिग्गज नेते ब्रिटनमध्ये ब्रिटिशांचया ताटाखालचे मांजर बनून वावरायचे हे सांगणे न बाबासाहेबांच्या समाजसूधारनावादी राष्ट्रभक्तीने सयाजिराव गायकवाडांना मनस्वी आनंद झाले. भाषणाचा अप्रतीम नमुना होता. महाराजांनी खुशीच्या भरात जंगी पार्टिचे आयोजन केले. त्या अनेक जनांनी बाबासाहेबांवर ते क्रांतीकारी गटाचे असावेत असा संशय घेतला. ठतीपी पोलादि स्पष्ट त्यांच्या वक्तृत्वाचा खास निर्भिडपणा होता. त्यांच्या मते 'सामाजिक व राजकीय असे मानवि वर्तृवणु दोन अलग भाग असुन त्यांचा एकमेकांवर काहीच परिणाम होत नाही असे मानणे ही चुकीची विचार आहे. सत्तेकरिता अरडाओरड करणारा भारतीय अमरावांचा वर्ग अस्पृष्यतेचा शाप चालु ठेव जबाबदार आहे. त्या शापामूळे सहा कोटि अस्पृष्यांना माणूसकीचे हक्क आणि सुसंस्कृतपणा ह होणाऱ्या लाभास मूकविले आहे. त्यांच्याइतकीच संख्या असलेले आदिवासी व गिरजिन यांना आणि भटक्या स्थितीत ठेवण्यास हे लोक जबाबदार आहेत' असे ते खडे बोल सुनावतोना दिसत सायमन कमीशनला विरोण आणि १९४२ च्या 'चले जाव' या कांगेसी धोरणविरोधि भूमीका घेतल्यान त्यांच्यावर टिकेची झोड उठविल्या गली म्हणून त्यांची राष्ट्रभक्ती कमी होत नाही. पहील्या महायुध्दा काळात म. गांधींनी ब्रिटिश सैनिकांची सेवा सुश्रृशा केली म्हणून ते ब्रिटिश साम्राज्याचे पाइक होते दुसऱ्या महायुध्दात फॅसिझम आणि नाझिझम आल्याने जगातील समस्त मानवतावादी लोक नीतीमुल्ये धोक्यात येणार होती. म्हणून ब्रिटिशांना अशा संकटाची मदत केली पाहीजे असा आ बाबासाहेबांनी धरला होता.

## सामाजिक कैफियत मांडणारे राजकारणी:

सृष्टितील भैतीक आणि जिवित दरक्षणी परिवर्तनशील आहे. दुनियेच्या स्पर्धेत उभे राहण्यासा कुपमंडुकवृती सोडुन प्रवर्तनाचे पाईक बनण्याशिवाय गत्यंतर नाही. कुचकामी, कुप्रथा, कुत्सित परं मानवी सभ्यतेचा गाभा नासवतात. सलोखा सौहार्द जखडबंद आयामात बंदिस्त केले जाते. म्हणून उज्व राष्ट्राचा ध्यास धरतांना तितकीच उदात्त सामाजिक संस्कृती अविष्कृत करणे अनिवार्य आहे. समसजा एकेरि वर्गविशेषाची मक्तेदारी राष्ट्रिय जडणघडणीस बाध्य ठरते. दुषोक्त सता राजकारणाने प्रस्था अहंगंड आणि विस्थापीतांचा न्युनगंड बडकट होतो. म्हणूनच राष्ट्रवादाला हेकेखोर एकेरी दृष्टिकोनाऐवज समग्रलक्षी सिध्दांताची गरज असते. बाबसाहेबांचे अमेरिकेत शिक्षण सुरू असतांना लाला लजपतराययांनी

ISSN 2394-6903

त्यांना क्रांतीकारी गोटात ओढण्याचा प्रयत्न केला. कराराप्रमाणे त्यांना वडोदा येथे नोकरि करावी लागणार होती. भारतातील जातीयता निमुलन, अल्पभुधारक शेतकऱ्यांच्या समस्या, औद्योगिकीकरण कनिष्ठ जातीयांचे मताधिकार, माणवी हकक असे प्रबोधन करत चळवठीला जोश दिला. तेव्हार्यंत टिळक हयात होते. १९२० नंतर डि. सी. मिशनच्या कर्मविर महर्षी शिंदेच्या धोरणावर टिका केली. प्रस्थापीतांच्या जिंवर विसंबून अस्पृश्यांचे उत्थान व्हावे ही भूमीका बाबसाहेब यांना पटली नाही. श्रध्दानंद, परमानंद आणि सावरकरांचे दिग्गज सूधारनावादी असुनही अस्पृश्यांना काहीच लाभ नव्हता. राजकीय नेते राष्ट्रिय आंदोलनात व्यस्त होते. काही परंपरा धार्जिने वेळ मारून गप्प होते. अस्पृश्यता हा आपल्यावर लागलेला कलंक आहे आपन स्वयंसिध्दीने मिटवू अशी भूमीका बाबसाहेबांची होती. दांडगा अभ्यास, प्रगल्भ विष्लेशन आणि प्रभावशाली निवेदनशैलीमुळे सामाजिक समस्या मांडतांना त्यांच्या नेतृत्वाला झोत मिळत गेली. इतीपी नेत्यांचा अनार केला नाही. महाळच्या परिषदेत म. गांधीजींची आणि छ. शिवाजी महाराजांची प्रतीमा सर्वज्ञात आहे. श्रध्दानंदाच्या निधनाविषयी दुःख व्यक्त केले. कॉग्रेसचा सायमन कमीशनला विरोध होता. बाबासाहेबांनी कमीशनसोबत सहकार्याची भूमिका पत्करली. परंतू लाल लाजपतराय यांच्यावर लाहोर येथे पोलिस हल्लयात जबर जख्मी होवुन मृत्यू पावले. तेव्हा ब्रिटिश शासनाची तमा न बाळगता आदपुर्वक श्रध्दांजली वाहीली.वर्कनहेड यांनी भारतातील लोक सर्वसामान्य संविधान हिलुच शकत नाही अशी दर्योक्ती केल्याने मोतीलाल नेहरूंच्या अध्यक्षेतेखली राज्यघटनेचा आराखडा बनविला. इतीपी मोतीलाल नेहरू मुसलमानांच्या दृष्ट कारस्थानाचे बळी ठरलेत त्यांच्या शिफारशी 'हिंदुंना धोका, तसेच हिंदुस्थानावर अरिष्ट आहे असे नमूद करतात.' मोतीलाल नेहरू मूसलमानधार्जिने असल्याचे परखड मत त्यांनी व्यक्त केले. " हिंदु समाजाचा आमच्यावर रोष आहेच. त्यात मूसलमान समाजाच्या रोषची भर पडणार हे बरे नव्हे. हे आम्हाला कळत आहे. पण ज्यात आमच्या देशाचे अकल्यान आहे त्यात आमचेही अकल्यान आहे. अशी आमची भवना असल्यामूळे ही जोखिम आमच्या शिरावर घेतली आहे". यावर राष्ट्रिय ध्येयधोरण व राष्ट्रभक्ती स्पष्ट होते. भारतीय राज्यघटनेचे भावि वेध त्यांनी अलगद हेरले. विविध संविधानाच्या पुस्तकांची खरेदि केली. पुस्तकांच्या उधारीसाठी घेतलेला प्लॉट विकला. प्राध्यापक, लॉ कॉलेजचे प्राध्यापक, विधायक, लॉ कॉलेजचे प्रिंसिपल, धोरनी साजसूधारक, राजकारणीपणातून आपोआप संघर्षशील राष्ट्रिय पुढिरपण आले.

महात्मा गांधीशी संघर्ष:

१९ व २० मार्च ला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महाडला चवदार तळयावर अस्पृश्यांच्या मानवि हक्कांचा उद्घोष करण्यासाठी आंदोलन पूकारले. त्यावेळेस भगतसिंग, चंद्रशेखर आझाद, इ. क्रांतीवीरांच्या हिंदुस्थान सोशालीस्ट रिपब्लिकन असोसिएशन या क्रांतीकारी संघटनेसह कांग्रेसच्या म. गांधी यांनी कोणीही काहीच दखल घेतली नाही. टिकाकारांची चौफेर अव्दातव्दा विरोध चिखलफेक मात्र सुरूच

 ISSN 2394-6903

होती. तथापी विध्वंसक शक्ती प्रदर्शनाला हत्व न देता त्यांनी विधायक राष्ट्रवादाची कास धरली. सायमन कमीशनला विरोध असल्याने पहील्या गोलमेज परिषदेला कोणीही कॉंग्रेसी उपस्थित नव्हते. पहील्या गोलमेज परिषदेचा अहवाल वाचुन बाबासाहेबांबाबत म. गांधींजींचा वैचारीक कल दूणावला. बाबासाहेब परिषदेला जाण्यापूर्वी सर्वांना आश्वस्त करतांना म्हणतात, मी माह्या लोकांसाठी न्याय्य मागणी करीन व आणी स्वराज्य मागणीचाही पाठपूरावा करीन. म. गांधीजींचा बाबसाहेबांशी हीतगूज करण्याची उत्कंठा बळावलेली दिसते.दरम्यान भारतीय राजकारण झपाटयाने बदलत होते. गोलमेज परिषदेतील रोखांप्रमाणे दि. २६ जानेवारी १९३१ रोजी कॉंग्रेस पुढाऱ्यांना जेलमूक्त केले. गांधिजींनी कायदेभंगाची चळवळ मागे घेतली. आणि दुसऱ्या अधिवेशनाला हजर राहण्याचे आश्वासन दिले. इतीपी अस्पृश्यांविषयी उच्चजातीय सामाजिक कार्यकर्ते व राजकीय नेत्यांमध्ये जराही सहानूभुती नव्हती. हिंदु तेवढा एक म्हणणारे अस्पृश्यांना हिंदु धर्मीय नोदवितांना न्याय, सम्मान, संरक्षण, संधि देण्यास मनस्वी धजावत नव्हते. ''स्वातंत्र्य मिळाल्यावर आपण मंदिर प्रवेशाची चळवळ आपन हाती घेउ'' असे गांधिजी सुचवितात प्रस्थापीत लोक सहाय्यक धजावत नसले तरी डॉ. आंबेडकर मात्र वेळोवेळी त्यांना सहाय्य करित होते. पनवेल जवळच्या कॉग्रसच्या जंगल सत्याग्रहींना सोडविण्यासाठी वकीली केली. गांधीजींनी ९ ऑगस्ट १९३१ रोजी पत्र लिहुण त्याच दिवशी रात्रौ ८ वाजता भेटावायास वेळ आहे की काय? अशी चौकशी केली आपण स्वतः डॉ. आंबेडकरांकडे घरी येण्याची मनिषा दर्शविली. सततच्या सभा, परिषदा, दौऱ्यांमुळे बाबासाहेब थकले होते. नुकतेच सांगलीवरून आले होते. अंगात १०६ अंशापर्यंत ताप फनफनत होता. नकार दिला परंतु १४ ऑगस्ट रोजी स्वतः मनिभवन येथे गांधीजींना भेंटायला गेले. संवाद दरम्यान गांधीजी त्यांच्यावर भुरळ पाडू शकले नाही. गांधीजींचा सयत राष्ट्रवाद आणि बाबसाहेबांचा जय्यत राष्ट्रवाद यात खडाजंगी उडाली. जिव्हाळा–विव्हाळादुसऱ्या गोलमेज परिषदेत अस्पृष्यांच्या नेतृत्वावरून व न्यायहक्कांवरून झालेले मतभेद विकोपाला गेले. गांधीजींच्या विरोधात उतरल्यामूळे संपुर्ण भारतात आंबेडकरांविषयी संपुर्ण भारतात व्देषभावना तयार झाली. रक्तशाईन्या लिखीत पत्राव्दारे फोनवर धमक्यांची, जिवे मारण्याची तूफान कवटळ आली. मात्र न डगमगता बाबासाहेब आंबेडकर आपली सैधांतीक भूमीका समर्थपने मांडतच होते. गांधी आंबेडकर संघर्षाबाबतग्लोर्ने बोल्टन म्हणतात– 'आंबेडकरांची कीर्ती दिवसानुदिवस वृध्दिंगत होत होती. भारतीय अस्पृष्यांची त्यांनी बाजू मांडण्यापासून हुजुर पक्षाच्या कींवा समाजवादि पक्षाच्या सभांतून अस्पृश्यांच्या भयंकर स्थितीचा उल्लेख ते करू लागले. गांधीर्जीचे गूरू गोखले यांनी केलेले भाकीत. '' जेव्हा राजकीय शिष्टाई कींवा वाटाघटी यांचा इतीहास लिहीला जाइल तेव्हा गांधी हे त्या बाबतीत अपयशी ठरल्याचे आढळुण येईल. वडिलांच्या वयाचे गांधीजी पोराच्या वयाच्या बाबासाहेबांपुढे गारद झाले. संतापले, हींदू मूस्लीम, शिख सगळयांच्या न्याय हक्कांना वाव देतांना मात्र उच्चभ्रू चा असंतोष ओढवु नये एवढच नेतृत्वाचे आव्हान उभे राहु नये म अहंमन्य न्युनगंडाने राजकारण चिरडले. मात्र बाबासाहेबांचा प्रज्ञाशील आत्मविश्ववास यथास्थितीत होता.

 ISSN 2394-6903

२९ जानेवारी १९३२ रोजी मुंबईत आले. सत्काराला उत्तर देतांना ते म्हणाले –' मी गांधीजींना विरोध म्हणून कॉंग्रेसजनांनी मला देशद्रोही म्हटले. मी या आरोपाची मुळीच भिती बाळगत नाही. माझी मनोदेवता मला सांगते की, हा आरोप धादांत खोटा, व्देशमूलक व निराधार आहे. माझ्या बांधवांची गुलामगीरीतून मुक्त करण्याच्या उच्च ध्येयास महात्मा म्हणविणाऱ्या व्यक्तीकडुन प्राणपणाने विरोध व्हावा हीच गोष्ट जगाच्या दृष्टिने चमत्कारीक आहे. गोलमेज परिषदेतील सर्व कार्याचा नीट, शांतपने विचार केल्यावर हिंदुची भावी पीढी मी राष्ट्राची चोख कामगीरी बजावली असाच निर्वाळा देईल. स्वतःच्या निस्सीम राष्ट्रभक्तीविषयी बाबासाहेबांना परिपुर्ण आत्मविश्वास होता. ख्रिश्चन, शिख, मुसलमानांप्रमाने अस्पृश्यांना स्वतंत्र मतदारसंघ दिल्यास प्राणंतीक उपोषणांचा जाहीर घोषणा गांधीजींनी केली. २० ते २४ सप्टेंबर १९३२या चार दिवसात गांधीजींच्या उपोषणाने अवघ्या भारतातील उच्चभ्रू समाज डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवर अक्षरक्ष: पेटून उठला. परिस्थिती भयंकर तनावाची होती. ४थ्या दिवसांत गांधीजींची तब्येत फार खलावल्यानचे सांगण्यात आले. जनप्रक्षोभ तीव्र होत होता. त्यानूतन अखेर २४ सप्टेंबर १९३२ रोजी पुणे येथिल येरवाडा कैदेत पुणे करार झाला.

<u>राष्ट्रभक्तीचा अनन्यसाधारण महामेरू:–</u>

स्वत:च्या आकलनाविषयी ते निश्चल असायचे १९२३ साली 'द प्रॉब्लेम ऑफ रुपी' शोधप्रबंध डि. एससी. या अत्युच्च पदवीकरीता कोलंबिया विद्यापीठास सादर केली. जागतीक ख्यातीच्या केन्स या अर्थशास्त्रज्ञाचे सिध्दांत खोडुन काढले. सत्य विदित करतांना ते विरोधकांच्या विरोधाला जुमानत नव्हते. पूढेच याच ग्रंथाच्या आधारे भारतात रिझर्व्ह बॅंकेची स्थापना झाली. 'जबाबार सरकारचे दायीत्व' हा निवंध वाचला तेव्हा प्रा. हेरॉल्ड लॉस्की यांना त्यांचे विचार ज्वलज्जहाल वाटले. ते क्रांतीकारी मताचे वा क्रांतीकारी मताचे असल्याचा संशय घेण्यात आला. १५ डिसेंबर १९२५ रोजी बाबासाहेबांची रॉयल कमीशनपुढे साक्ष झाली. त्यात ते म्हणतात–हुंडणबळीच्या अदलीबदलीत सुवर्ण परिणाम सुरू ठेवणे भारताच्या हिताचे नाही. कारण सुवर्ण परिणमाला भारतात मूळी स्थैर्य नाही राष्ट्रहितदक्ष बाबासाहेबांनी या बाबतीत पुढे बेसिल ब्लकेट यांच्या चलनसुधारणाविषयी विधेयकाला विरोध करण्यासाठी न. चीं. केळकरांशी संपर्क साधला, धडपड केली. वृत्तपत्रात लेख लिहीले. एम. ए. च्या शोधप्रबंधात देखिल त्यांनी ब्रिटिश शासनावर घणाझाती टिका केली. पीएच. डी. चा प्रबंध सुध्दा त्यांच्या राष्ट्रभक्तीची साक्ष पटवुन देतो. ते व्यासंगी नेत्यांची स्तूती करतात. दादाभाई नौरोजी, फिरोजशहा मेहता, गोखले, आगरकर, टिळक इ. यांच्या चिंतन व अभ्यासाला मनोभावे कुर्णिसात करतात. पुणे करारानंतर मंदि प्रवेश चळवळी विषयी गांधीजी नी आंबेडकर यांच्यातील मतभिन्नता पूढे आली. मात्र स्वा. सावरकरांविषयी आपुलकी वाटते. रत्नागीरी येथे बांधलेल्या नविन देवळाच्या उद्‌घटनासाठी आंबेडकरांना आमंत्रण दिले तेथे ते जाऊ शकले नाही. परंतू अभिप्राय दिला तो असा 'पुर्वनियोजित कामामूळे मी येउ शकत नाही, परंतु आपन समाजसुंधारनेच्या क्षेत्रात काम करित आहात त्या विषयी अनुकूल अभिप्राय देण्याची ही संधी घेत आहे.'

ISSN 2394-69..

यातील भवार्थ समजने गरजेचें आहे. १९३६ साली त्यांनी स्वतंत्र मजूर पक्ष स्थापना केली. त्यांचं सार्वत्रिक सर्वसमावेशक लक्षणिय आहे. १९३७ मध्ये कॅाग्रेसच्या धनजी शहा इतर मंत्र्यासकट मुख्यमंत्री बनले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर निमंत्रण दिले. परंतू बहुसंख्यांकांचे नसलेले अवैध सरकार संबोधून त्यांची बोळवण केली. 'थॉट्स ऑन पाकीस्तान' या ग्रंथात हिंदु मूस्लीमांचे चिघडलेल्या वैमनस्यातून ते वेगळया पाकीस्तानचे संदेश देतात. त्यावर मंतव्य देतांना ते म्हणतात. 'पाकीस्तान मीळाले तर सर्व हिंदुस्तानवर मुसलमान आपले साम्राज्य पसरवतील असा खोटा समज करून घेउ नका. हिंदू त्यांना धुळ मीळवतील. स्पृश्य हिंदूची काही मुदयावर माझे भांडण आहे. हे मी मान्य करतो. परंतू तूमच्यासमोर अशी प्रतीज्ञा करतो की, आमच्या देशाचे स्वातंत्र रक्षण करण्यासाठी मी आपले प्राण अर्पण करिन. यावरून त्यांची राष्ट्रभक्ती कशी बावणकशी आहे हे लक्षात येते. जिन्ना यांनी ५०टक्के प्रतीनिधीत्वाची मागणी केली होती. तीला ते 'आसुरीवृत्ती' म्हणतात. २० जुलै १९४२ रोजी व्हाईसराय गर्व्हनर जनरल च्या शासनात भारताचे मजूरमंत्री बनले. दुसऱ्या युध्दांचा झंझावात घोंगावत होता. नाझियम व फॅसिझियमने लोकशाही प्रणाली लयाला जातील म्हणून सर्वांनी लोकहीतैशी वृत्तीने जुलुमी हुकूमशाही वृत्तीला हाणून पाडावे असे प्रतीपादन केले. रानडेंना ते थोर पुरूष मानतात. आर्थिक आणि औद्योगीक बळावर पाश्चिमात्य राष्ट्रे पौवात्य राष्ट्राकडे चढेल वृत्तीने पाहतात. असा त्यांचा निष्कर्ष होता. ६ मे १९४५ रोजी बाबासाहेबांनी हिंदु—मुस्लीम ऐक्याची योजना दिली. एस. के. एफ. ला सत्कारात उत्तर देतांना ते म्हणाले आपन हिंदुस्थानचे नागरिक आहात हे सिध्द करण्यासाठी अस्पृश्यवर्गाने आटोकाट प्रयत्न करावे. अस्पृश्यवर्ग मुसलमानांप्रमाणे भुभाग तोडून मागत नाही. त्यांना समान हक्क पाहीजेत. आश्रय नको. एकसंघ भारताची संवैधानीक नीतीसंहीता त्यांच्या घटनासमितीतील मन्वंतरावरून लक्षात येते. पायात असहय वेदना असतांनाही ते महात्मा गांधींच्या अंत्ययात्रेला गेले. ओ. बी. सी. आणि स्त्रीयांच्या हितांचे धोरणाबाबत नेहरू सरकार आडमूठे भासल्याने त्यांनी कायदेमेत्री पदाचा राजीनामा दिला. मात्र ब्रिटिश मंत्रीमंडळात मजुरमंत्री असतांना नेहरू गांधी इ. नेत्यांना अंदमान निकोबारच्या जेलमधुन टाकण्याच्या ब्रिटिशांच्या मनसुब्याला त्यांनी कडाडुन विरोध केला. भारतांच्या स्वातंत्र्यासाठी सुभाषचंद्र बोसांचे अहर्निश योगदान ते लोकांना पटवुन देतात. नेहरूंनी समाजवादी पक्षास मीळुन देशाची धुरा वाहावी असे २५ नोव्हेंबर १९५१ च्या मुबईतील सभेत म्हणतात. कॅाग्रेस दलीत समाजाच्या आणि मागासलेल्या समाजाच्या हीताकडे दुर्लक्ष करते असा त्यांचा समज होता. राष्ट्रभावी, समाजसेवी, आणि समाजवादी यांतील फरक समजल्यास सत्तालोभी बेगडी नेत्यांचे पितळ उघड करता येते. त्यांना सर्वसमाजवाद्यांची मोट बांधायची होती. रिपब्लिकन पक्ष निर्मितीविषयी लोहियावादी नेत्यांशी केलेल्या पत्रव्यवहारावरून त्यांची साक्ष पटतं. चिडून ते नेहरूंना अस्पृश्यवादी म्हणतात. अर्थात नेहरूंकडून त्यांना द्रुतगती प्रवर्तनाची खास अपेक्षा असावी. लोकहीतवादी, शाहु महाराज, राजारामशास्त्रि भागवत, वीर सावरकर, डॉ. श्यामाप्रसाद मूखर्जी, सरदार पटेल, डॉ. राजेंद्र प्रसाद, नरीमन, डॉ. खरे यांचे विषयी ते आदर बाळगतात.

ISSN 2394-6903

पंडित जवाहरलाल नि मौलाना आझाद यांना भारतीय संस्कृतीची प्रतीके मानतात. महंम्मद अली जिन्ना, कन्हैयालाल मुन्शी, नि पंडित गोविंद वल्लभ पंत यांच्या विषयी त्यांना तिरस्कार वाटे. नवोदित नेते श्री. म. जोशी नि अशोक मेहता यांच्याविषयी त्यांना कोतुक वाटे. 'चिंधिची साप आणि नांद्यांला ताप' अशी वृत्ती बांळगणाऱ्या तकलादू राजकारणदुशितांना म्हणूनच बाबासाहेबांची पारखी राष्ट्रभक्ती कळलेली दिसत नाही.

निष्कर्ष व उपाययोजना:

१) सवर्णांचा जन्मानूगत अहंकार अवर्णांनी समाजात सन्मान, संधी, संरक्षण देण्यास अडचणीचा ठरतो. त्यामानाने धर्मद्वेष, जातीद्वषाचे स्वरूप सैम्य आहे. म्हणून भारतीय मुलतत्ववादी सनातनी वैदिक चातुर्वर्ण्य समाजव्यवस्था उन्मूलन करून एकवर्णीय व्यवस्था निर्माण करणे गरजेचे आहे.

२) जातीनुसार व्यवसाय अगर व्यवसायानूरूप जात हया दोन्ही तर्कसंहीता तकलादू असुन तर्कसंगत तसेच संयुक्तिक नाहीत. कोणताही धंदा, व्यवसाय पेशा, व्यापार करूनही निम्न जातीय लोकांना अहंमन्यग्रस्त वरिष्ठ जातीचे लोक वरिष्ठ श्रेणिच्या स्तरिकरणात प्रवेशास मनापासून नाकारतात. एकवर्णिय सामाजिक धर्मसहीता आल्यास जातीयता दिसुन येइल.

३) सत्ताराजकारणाच्या सारीपाटावरिल सत्तालंपट सोंगटे स्वार्थ्थ सत्तालालसेपोटी वस्तुनिष्ठ सत्यांन्वेशी मूलतत्वांना मखलासीने विकृत प्रवृत्तीत परिणत करतात. मानवी संस्कृती रसातळाला नेतात. तथ्याचे परिस्थिती सापेक्ष विश्लेषन करून अनिवार्यत: मुल्यमापनास, चिकीत्सक बुध्दिप्रमाण्यतेला यथोचित वाव दिला पाहीजे.